*सर्व विद्यार्थ्यांना नमस्कार!*

आज महात्मा गांधीजींची जयंती आहे. सुरुवातीला आपण मोठया आवाजात घोषणा देऊ.

*महात्मा गांधी की जय!*

*महात्मा गांधी की जय!*

आज मी तुम्हाला महात्मा गांधीजींची एक खरी घडलेली गोष्ट सांगणार आहे.

*ही गोष्ट आहे १९१७ सालची.* इंग्रज भारतीय लोकांवर खूप अत्याचार करत होते. इंग्रजांनी शेतकऱ्यांवरही खूप अत्याचार केला. इंग्रजांनी शेतकऱ्यांना सांगितले होते की *आम्ही जे सांगू तेच पिकवायचं. जर शेतकऱ्यांनी पिकवलं नाही तर त्यांच्याकडून भरपूर सारा दंड वसूल करायचे. तसेच शेतकऱ्यांना खूप मारहाण करायचे.*

असाच अत्याचार इंग्रजांनी चंपारण्या जिल्ह्यातील साडे आठशे गावातील शेतकऱ्यांवर केला होता. त्यांना नीळ पिकावायची जबरदस्ती केली होती. ती नीळ ते इंग्लंडला घेऊन जायचे. शेतकऱ्यांची अवस्था खूप वाईट झाली होती. शेतकरी खूप गरिबीत जगत होते. त्यांना खायलाही मिळत नव्हते.

अशावेळी एक शेतकरी त्यांचं दुःख घेऊन गांधीजींकडे आले. गांधीजींनी पहिले त्यांना पोटभर जेवायला दिले आणि नंतर त्यांची सर्व परिस्थिती ऐकून घेतली.

गांधीजी गांधीजी त्या शेतकऱ्याच्या चंपारण्य या गावात पोहोचले. हे गाव बिहार राज्यातील आहे.

गांधीजींच्या स्वागतासाठी हजारो लोक रेल्वे स्टेशनवर उभे होते.

शेतकरी एकत्र जमले होते त्यांची गांधीजींनी भेट घेतली. त्यांची सर्व कहाणी ऐकून घेतली.

गांधीजी शेतकऱ्यांना एकत्र करतायेत ही गोष्ट इंग्रजांना कळली. इंग्रजांनी त्यांना पकडून जेलमध्ये टाकले. पण गांधीजी थोडेही घाबरले नाहीत.

*नंतर त्यांना न्यायालयामध्ये उभे केले.*

त्यावेळी अनेक गावातील लोक न्यायालयामध्ये आणि न्यायालयाच्या बाहेर उभे होते. *सर्वांच्या मनात होतं की इंग्रज गांधीजींना आता काय शिक्षा करतील?*

तेव्हा काय घडलं पहा.

(इंग्रजांच्या आवाजाची नक्कल करत)

*जज -* तू जनतेला भडकवलं आहेस म्हणून तुला बिहार सोडण्याचा हुकूम दिला जातोय.

*महात्मा गांधी -* तुमचा पूर्ण आदर ठेवून मी इथून जाण्याचा नाकारत आहे.

*जज -* मग तुला जेलमध्ये जायचं आहे का?

*महात्मा गांधी -* जशी तुमची इच्छा!

*जज -* मी तुला सोडून देईल, पण तुला १०० रुपये दंड भरावा लागेल.

*महात्मा गांधी -* मी शंभर रुपये देण्यास नकार देतोय.

*जज -* (चिडून, वैतागून) मग मी तुला पैसे न देता सोडून देतोय.

इंग्रजांनी काहीच न करता गांधीजींना सोडून दिले हे पाहून लोकांनी गांधीजींच्या नावाचा जयघोष केला.

*महात्मा गांधी की जय!*

*महात्मा गांधी की जय!*

एक साधा, हाडकुळा माणूस, हातात कोणतेच शस्त्र नाही तरीही इंग्रजांना घाबरला नाही.

हे पाहून लोकांच्या मनातील भीती सुद्धा पळून गेली.

अशाप्रकारे *गांधीजींनी लोकांच्या मनात हिंमत भरली.*

म्हणून गांधीजी मजबुती का नाम महात्मा गांधी आहेत.

सर्वांनी मोठ्याने घोषणा द्या.

*मजबुती का नाम - महात्मा गांधी!*

*मजबुती का नाम - महात्मा गांधी!*

धन्यवाद!